# ॲग्रोमेटॲडवायझरी बुलेटीन

ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

कृषि हवामानशास्त्र विभाग

कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५

फोन : ०२०-२९५१६२६४

ई-मेल : amfupune@gmail.com


## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २७/१०/२०२६

## जिल्हा : सोलापूर

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२७/१०/२०२६ ते ३१/१०/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 28 | 29 | 30 | 31 | 1 |
| पाऊस (मिमी) | 0.0 | 0.0 | 1.0 | 1.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.सें.) | 36 | 35 | 33 | 33 | 34 |
| किमान तापमान (अं.सें.) | 20 | 21 | 21 | 19 | 18 |
| ढग स्थिती (आकाश) | 3 | 6 | 4 | 3 | 4 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 58 | 80 | 82 | 82 | 80 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 33 | 48 | 50 | 47 | 48 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 11 | 14 | 9 | 6 | 10 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 23 | 4 | 353 | 295 | 331 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

<table>
<tr><th>पीक</th><th>पीक अवस्था</th><th>कृषि विषयक सल्ला</th></tr>
<tr><td colspan="2">हवामान सारांश/ इशारा</td><td>भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २७, २८ व ३१ ऑक्टोबर, २०२६ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता तर दिनांक २९ व ३० ऑक्टोबर, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.</td></tr>
<tr><td colspan="2">विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस)</td><td>विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०१ ते ०७ नोव्हेंबर, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.</td></tr>
<tr><td colspan="2">सामान्य सल्ला</td><td>• हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल ॲपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या 'कृषिदर्शनी'चा आणि सद्यस्थितीचा विचार करता आपत्कालीन पीक नियोजन पुस्तिकेचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• ओलाव्याचा तीव्र ताण असल्यास पिकांवर अनावश्यक फवारणी टाळावी.<br>• पिकांची नियमित पाहणी करा : जमिनीतील ओलावा, पिकाची अवस्था व ताणाची लक्षणे वेळेवर ओळखा.<br>• सेंद्रिय आच्छादन करा : पिकांचे अवशेष , कडबा, पेंढा किंवा वाळलेले गवत वापरून जमिनीतील ओलावा टिकवा. आच्छादनामुळे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते.<br>• कीड व रोगांचे निरीक्षण करा : आर्थिक नुकसान पातळीच्या जवळपास प्रादुर्भाव आढळल्यास शिफारशीनुसार नियंत्रण उपाय करा. अनावश्यक कीटकनाशक/बुरशीनाशक फवारणी टाळा.<br>• जिल्ह्यातील कोरडवाहू/बागायती क्षेत्रात पिकाच्या संवेदनशील वाढीच्या अवस्थेत संरक्षित पाण्याची उपलब्धता असल्यासच रब्बी पिके जसे हरभरा, करडई आणि रब्बी ज्वारी पिकांच्या पेरणीचे नियोजन करावे. पेरणी साठी कमी कालावधीच्या वाणांची निवड करावी.<br>• संरक्षित सिंचनाचा अत्यंत काटकसरीने वापर करावा. जास्तीत जास्त पाणी बचती साठी तुषार अथवा ठिबक सिंचनाचा कटाक्षाने वापर करावा.<br>• रब्बी हंगामात पेरणी करताना शक्यतो आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. उदा. ज्वारी + हरभरा (६:३) , करडई + हरभरा (३:६).<br>• जल व मृद संधारणासाठी बी बी एफ यंत्राद्वारे पेरणी करावी.<br>• पेरणीवेळीस फुले बायोमिक्सची बीजप्रक्रिया करावी तसेच सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यास फुले ग्रेड II ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी.<br>• रब्बी हंगामात पिकामध्ये तणनाशके यांचा वापर कमी करून वेळोवेळी कोळपणी आणि खुरपणी करून पिके तणविरहित ठेवावीत.<br>• कोरडवाहू क्षेत्रात रब्बी हंगामा तील पिकात कोळपणी केल्यास जमिनीस पडणाऱ्या भेगा बुजवल्या जाऊन जमिनीतील बाष्पीभवन कमी होऊन ओलावा टिकविण्यास मदत होते.<br>• रब्बी हंगामातील पिकात विरळणी करावी कारण रोपांची संख्या जास्त झाल्यास ओलाव्यासाठी स्पर्धा वाढते आणि पीक फुलोऱ्यात येण्याच्या वेळी ओलावा कमी पडून उत्पादनात घट येते.</td></tr>
<tr><td>ऊस</td><td>पीक वाढीची अवस्था</td><td>खोड किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे. तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | ऊस पिकावरील पायरीला किडीचे नियमित निरीक्षण करावे. सरासरी ३ ते ५ पिल्ले किंवा प्रौढ कीड प्रति पान अथवा एका पानावर एक अंडीपुंज आढळल्यास आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्याचे मानून त्वरित नियंत्रणाच्या उपाययोजना सुरू कराव्यात. आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतरच क्लोरपायरीफॉस २० टक्के ई.सी. ३० मि.ली. किंवा ॲसिफेट ५० टक्के + इमिडाक्लोप्रिड १.८० टक्के एस.पी. ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. फवारणीपूर्वी संबंधित कीटकनाशकाचे सध्याचे CIBRC लेबल-क्लेम, पीक व किडीसाठी मंजुरी तसेच लेबलवरील सूचना तपासूनच वापर करावा. उभ्या ऊस पिकातील खालची वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावी. पिकास पाण्याचा ताण पडत असल्यास दर तीन आठवड्यांनी २ % मुरेट ऑफ पोटॅश व २ % युरिया यांचे मिश्रण तयार करून पिकांवर फवारणी करावी. |
| करडई | पिक वाढीची अवस्था | संरक्षित पाण्याची उपलब्धता असल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे तसेच सद्यस्थितीत पिकाच्या वाढीच्या अवस्थेप्रमाणे पिकात कोळपणी आवश्यक आहे. |
| रब्बी ज्वारी | पेरणी ते पिक वाढीची अवस्था | जिथे ओलीताची सोय आहे अशा ठिकाणी ज्वारीची पेरणी ५ सें.मी. खोलीवर करावी. ज्वारीची पेरणीस उशीर झाल्यास दर आठवड्याला उत्पादनामध्ये साधारणपणे १-२% घट होते. जमिनीच्या खोलीनुसार पिकाच्या वाणाची निवड करावी<br>१) हलकी जमीन (खोली ३० सें.मी. पर्यंत) : फुले अनुराधा, फुले माऊली, फुले यशोमती.<br>२) मध्यम जमीन (खोली ६० सें.मी. पर्यंत) : फुले सुचित्रा, फुले माऊली, फुले चित्रा, परभणी मोती, मालदांडी-३५-१,<br>३) भारी जमीन (६० सें.मी. पेक्षा जास्त) : सुधारित वाणः फुले पुर्वा , फुले वसुधा, फुले यशोदा, सी.एस.व्ही.२२, पी. के. व्ही. क्रांती, परभणी मोती, संकरित वाण : सी. एस. एच. १५ आणि सी.एस. एच. १९. पेरणी ४५×१५ सें.मी. अंतरावर करावी. शिफारशीप्रमाणे खत पेरणीच्या वेळी वापरावे. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास १० ग्रम किंवा १० मिली फुले सुपर बायोमिक्सची बीजप्रक्रिया करावी. बागायत ज्वारीची पेरणी ४५×१२ सें.मी. अंतरावर करावी. पेरणीसाठी हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. पेरणीसाठी दोन चाड्याची पाभर वापरून एकाच वेळी खत व बियाणे पेरावे. जिथे ज्वारीची पेरणी लवकर झाली आहे तिथे खोड किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ५ ते ६ ट्रायकोकार्ड आठवड्याच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे. ज्यांच्याकडे पाण्याची उपलब्धता असेल त्यांनी पिकास संरक्षित पाणी द्यावे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेप्रमाणे पिकात कोळपणी करावी (पेरणीनंतर तीन, पाच आणि आठ आठवड्यानी). |
| गहू | पेरणी अवस्था | वेळेवर बागायती पेरणी १ ते १० नोव्हेंबर दरम्यान करावी. साधारण १००–१२५ किलो बीयाणे प्रती हेक्टर वापरावे. लागवड २०–२२.५ सेंमी ओळीचे अंतर ठेवून पेरणी करावी. प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरम या बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करून नंतर थायोमेथोझोंम ७० डब्लू.पी. १७.५ मिली प्रती १० किलो बियाणे कीटकनाशकाची आणि त्यानंतर अझोटोबॅक्टर २५ ग्रॅम प्रती किलो बियाणे अशी बीजप्रक्रिया करावी. |
| रब्बी मका | पेरणी अवस्था | पेरणी १५ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर पर्यंत करावी. पेरणीसाठी १५–२० किलो प्रती हेक्टर बीयाणे वापरावे. लागवड अंतर मध्यम व उशिरा येणाऱ्या वाणांसाठी ७५ × २० सेंमी, तर लवकर येणाऱ्या वाणांसाठी ६० × २० सेंमी. ठेवावे. प्रति किलो बियाण्यास २ –२.५ ग्रॅम थायरमची बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर अझोटोबॅक्टर २५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास लावावे. |
| तुर | शेंगा पोसण्याची अवस्था | सिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी तुरीची पेरणी केलेली असल्यास पेरलेल्या तुरीची शेंगा पोसण्याच्या अवस्थेत संरक्षित पाणी द्यावे . तुरीच्या शेंगा भरण्याच्या अवस्थेत शेंगा पोखरणाऱ्या किडींनी आर्थिक नुकसानकारक पातळी ओलांडली असेल तर इंडोक्झाकार्ब १४.५ टक्के एस.सी. प्रवाही ७ मि.ली. किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ टक्के एस.जी. ३ मि.ली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | बागेत करपा रोगा च्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी मेटिरम + पायऱ्याक्लस्ट्रोबिन या संयुक्त बुरशीनाशकाची तीन ग्रॅम प्रति लिटर पाणी अधिक बॅनोले (मिनरल ऑइल) १० मिली प्रति लिटर किंवा Azoxystrobin + Difenconazole २ मिली प्रति लिटर पाणी किंवा टेबुकनाझोल + ट्रीफ्लॉप झीस्ट्रोबिन ०.५ मिली प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. नवती बागेला कार्बेन्डाझिम १ ग्रॅम किंवा Tilt (Propiconazole) ०.५ मिली प्रति लीटर + मिनरल ऑइल १० मिली प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. सीएमव्ही या विषाणूजन्य रोगग्रस्त झाडे उपटून , ईमिडाक्लिप्रिड ०.५ मिली प्रति लिटर प्रमाणे फवारणी करावी. जर कंदसड रोग दिसला तर त्या झाडाला चार ग्रॅम प्रति झाड प्रमाणे ब्लीचिंग पावडर बांगडी पद्धतीने देऊन नंतर पाणी द्यावे . केळी लागावडीनंतर चौथ्या महिन्यात सुक्ष्म अन्नद्रव्ये इडिटीए-जस्त आणि इडिटीए-लोह यांची प्रत्येकी ५० ग्रॅम मात्रा १० लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी. बागेस उपलब्धतेनुसार व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. पाणी देण्यासाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा. मृद ओलावा संवेदक वापरून गरजेनुसार सिंचनाचे नियोजन करावे. बागेला पाणी देताना शक्यतो रात्री किं वा पहाटे पाणी द्यावे. अच्छादनाचा वापर ३० मायक्रोन जाळीचा चंदेरी रंगाचा पॉलिथिन केळीच्या दोन ओळीतील मोकळया जागेत टाकण्यात यावे . सेंद्रिय आच्छादनाचा वापर केळीच्या दोन ओळीत वाढलेले उसाचे पाचट गव्हाचा भुसा सोयाबीनचा भुसा याचा सेंद्रिय आच्छादन म्हणून वापर करावा . केळी पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार ठिबक सिंचनातून शिफारशीत खते द्यावेत. बाष्पीरोधकाचा वापर केओलीन बाष्परोधक पावडरची ८० ग्रॅम प्रति लिटर प्रमाणे पंधरा दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. ऍसिटिल स्यालीसिलिक आम्ल १८० मिलिग्रॅम (इथेनॉलमध्ये विरघळून) प्रती दहा लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी. घड़ व्यवस्थापन घड पूर्ण निसल्यावर केळ फुल वेळीच कापावे , घडांवर आठ ते नऊ फण्या ठेवून बाकी खालच्या फण्या कापून टाकाव्यात केळीचा घड पूर्ण निसवल्यावर व तद नंतर पंधरा दिवसांनी दहा लिटर पाण्यात ५० ग्रॅम पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट अधिक १०० ग्राम दुरिया मिसळून धडावर फवारणी करावी किंवा केळफुल |

| | | |
|---|---|---|
| | | कापल्यानंतर एकदा व त्यानंतर तीस दिवसांनी दुसऱ्यांदा दहा लिटर पाण्यात २०० ग्राम सल्फेट ऑफ पोटॅश मीसळून पहावर फवारणी करावी, घडावर ६% सच्छेद्रतेच्या पांढच्या पॉलिथिन पिशव्यांचे आवरण करावे, बागेभोवती कुंपण करावे. करप्याची रोगग्रस्त पाने कापून नष्ट करावे. सी एम व्ही विषाणू रोगाचे झाडे दिसल्यास उपटून नष्ट करावी व निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| **डाळिंब** | पीक वाढीची अवस्था | मृगभाराची फळे वाढीच्या अवस्थेत असल्यास पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळांची संख्या मर्यादित ठेवावी. लहान फळे काढून टाकावीत. हस्त बहार धरणाऱ्या शेतकरी बांधवांनी पाण्याची उपलब्धता नसल्यास बाग विश्रांतीवर सोडावी तसेच बागेमध्ये झाडांभोवती ऑरगॅनिक अच्छादन करावे व गरजेनुसारच पाणी द्यावे. पाण्याची उपलब्धता , वाढते तापमान बघता पीक घेण्यापेक्षा झाडे वाचवणे यावर भर द्यावा. |
| **पेरू** | पीक वाढीची अवस्था | अर्ध पक्व फळावर फळमाशीच्या नियंत्रणासाठी एकरी १० कामगंध (मिथिल युजिनाल) सापळे लावावेत. पेरू या पिकावर सूत्रकृमीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ट्रायकोड र्मा प्लस या जैविक नियंत्रकाची १० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात खोडाभोवती आळवणी करावी. पेरूमधील एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करताना त्यामध्ये ग्रेड II या सूक्ष्म अन्नद्रव्याचा समावेश प्रामुख्याने करावा आणि फुले सुपर बायोमिक्स या जैविक उत्पादनाचा वापर ४ लीटर प्रती एकर या प्रमाणात ठिबकद्वारे करावा यामुळे जमिनीतील हानिकारक बुरशींचा नाश करता येतो. |
| **सिताफळ** | पीक वाढीची अवस्था | हलक्या जमिनीत ५ ते ६ दिवसांनी , मध्यम जमिनीत ८ ते १० दिवसांनी आणि भारी जमिनीत १० ते १२ दिवसांनी पाणी द्यावे. बागेस ठिबक सिंचनाचा वापर करावा. सिताफळाची काढणी पक्वतेची लक्षणे दिसल्यास जसे फळांचा रंग फिकट हिरवा झाल्यावर , फळाचे डोळे उघडून दोन डोळयांमधील भाग पांढरट पिवळसर रंगाचा दिसू लागल्यावर फळांचे खवले उंच होतात, फळांची साल डोळयामधून फाटण्यास सुरुवात झालेवर काढावीत. फळे काढल्यानंतर प्रतवारी करुन क्रेटमध्ये अगर कोरुगेटेड फायबर बोर्ड बॉक्सेस मध्ये पॅकिंग करुन त्वरीत विक्रीसाठी पाठवावी. |
| **फळबाग** | नियोजन | सध्याच्या हवामानामुळे फळबागांमध्ये बाष्पीभवन कमी करण्यासाठी सेंद्रिय आच्छादनाचा वापर करावा तसेच बाष्परोधकाची (केओलीन ३%) फवारणी करावी. बागेस ठिबक सिंचनाचा सकाळ आणि संध्याकाळी वापर करावा. फळधारणा जास्त असल्यास विरळणी करावी. बागेत नत्र खताचा वापर कमी करावा. बाग नेहमी तणनियंत्रण करून स्वच्छ ठेवावी. बागेस सेंद्रिय खतांचा वापर करावा. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | पाणी अत्यंत मर्यादित असल्यास मोठ्या क्षेत्रावर चारा पीक घेण्याऐवजी आवश्यक पशुधनासाठी मर्यादित क्षेत्रात संरक्षित सिंचनाखाली चारा उत्पादन करण्याचे नियोजन करता येईल. उपलब्ध पाणी , पेरणीची वेळ, जमिनीतील ओलावा आणि स्थानिक हवामान लक्षात घेऊन ज्वारी , बाजरी, मका, बरसीम किंवा लुसर्न यांसारख्या चारा पिकांचा विचार करता येतो. संभाव्य चाराटंचाई लक्षात घेऊन उपलब्ध हिरवा चारा , कडबा, पिकांचे अवशेष, वाळलेला चारा आणि इतर स्त्रोतांचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन , कमी पाण्यात येणाऱ्या चारा पिकांची लागवड, मुरघास निर्मिती, चाऱ्याची पौष्टिकता वाढविणे तसेच सामूहिक चारा व्यवस्थापन यांवर विशेष भर देणे गरजेचे आहे. उपलब्ध हिरवा चारा एकाच वेळी मोठ्या प्रमाणात जनावरांना देण्याऐवजी त्याचे नियोजनबद्ध वाटप करावे. सोयाबीन, ज्वारी, बाजरी, मका, तूर आणि इतर पिकांपासून उपलब्ध होणारे अवशेष चारा म्हणून वापरावेत. या अवशेषांचे योग्य प्रकारे कुट्टीकरण करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक केल्यास भविष्यातील चाराटंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होते. |

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : २७.१०.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**